VOL- XI ISSUE- VI JUNE 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती : बदलते स्वरूप

**डॉ. मनिषा झोंबाडे**
सहा. प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय मुरुड, लातूर.

**प्रस्तावना :**

महापुरुषांच्या जयंत्या करतेवेळी महापुरुषांकडे एक योद्धा या दृष्टिकोनातूनच पाहणे गरजेचे आहे. फक्त भाषणांमधूनच नव्हे तर तुमच्या कृतीतूनही महापुरुषांचा गौरव झाला पाहिजे असं मला प्रामाणिकपणे वाटते. सर्व महापुरुषांच्या जयंत्या आपण उत्साहाने साजऱ्या करून समाजामध्ये एकोपा निर्माण करणे आजच्या काळाची गरज आहे.

समाजातील आजच्या परिस्थितीबद्दल उदाहरण द्यावयाचे झाले तर लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांची जयंती केवळ मातंग समाज नव्हे तर सर्व समाज बांधव एकत्र येऊन करताना दिसतात. सरकारी अथवा खाजगी शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालय इत्यादी ठिकाणी महापुरुषांच्या जयंती साजरी करणे अनिवार्य आहे. त्यामुळे येथे सहसा जातीभेद जास्त दिसून येत नाही. परंतु ग्रामीण भागामध्ये आज सुद्धा भयान वास्तव दिसून येते. ग्रामीण लोकांची जुन्या चालीरीतींना सोडण्याची मानसिकता दिसत नाही तेथे आजही त्या-त्या विशिष्ट जाती- धर्माचे लोक आपापल्या जातीच्या महापुरुषांची जयंती करतात. त्या जयंती मध्ये सर्वधर्मसमभाव दिसत नाही. आपली महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीमध्ये अनेक महापुरुष जन्माला आले ते केवळ जातीभेद नष्ट करण्यासाठीच. हे कुठे या समाजाला कळते. सकारात्मक भूमिका बाळगून समाजाने जर एकोपा निर्माण केला तर महापुरुषांनी पाहिलेली सर्व स्वप्ने सार्थक झाली असे. त्यापलीकडे जाऊन सांगावयाची झाले तर आपला समाज हा नेहमी तळागाळातील व्यक्तींच्या हिताचा विचार करीत नाही. प्रत्येक जण स्वार्थीपणाने जगतो. स्वतःचा फायदा पाहतो. परंतु महापुरुषांमध्ये ही भूमिका अजिबात दिसून येत नाही. महापुरुष हे नेहमी गोरगरीब, दलित कष्टकरी, शेतकरी यांच्यासाठी झगडत होते. जातीविरहित समाज निर्माण करण्यासाठी या महापुरुषांचे जे अनमोल कार्य आहे त्या कार्याची आपणा सर्वांना जाणीव आहे. एका जातीसाठी नव्हे, तर समस्त तळागाळातील माणसांच्या आजादीसाठी या महापुरुषांचे कार्य आहे. हे सर्व ज्ञात असतानाही समाजाला कसा या महापुरुषांच्या कार्य कर्तृत्वाचा विसर पडतो. मागच्या १० वर्षापूर्वीची परिस्थिती जर पाहिली तर जयंती साजरा करताना त्या- त्या जातीचे लोक आपापल्या महापुरुषांच्या जयंती साजरा करताना दिसून येत होते .

माझ्या मते, महापुरुषांना जातीच्या चौकटीमध्ये कधीच तोलू नये. एक समताधिष्ठ, स्वाभिमानी, संघर्षवादी समाज निर्माण व्हावा, यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, स्वतंत्रवीर सावरकर, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे इत्यादी महापुरुष समस्त मानव जातीच्या हक्कासाठी शेवटच्या श्वासापर्यंत झगडले आणि आपण याच महापुरुषांना जातीच्या चौकटीमध्ये बांधतो. खरंतर डॉ. अण्णा भाऊ साठे हे मातंग समाजात जन्मलेले असले तरी त्यांच्या साहित्यात कुठेही जातिवादाबद्दल वाच्यता दिसून येत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या शूरवीर राजाचा पोवाडा अण्णा भाऊंनी रशियामध्ये गायला. रशियन लोकांना आपल्या मातृभूमीच्या राजाचे महत्त्व पटवून दिले.

*"प्रथम मायभूमीच्या चरणा*
*छत्रपती शिवबा चरणा ।*
*स्मरोनी गातो कवना ॥"*

शिवरायांबद्दल किती हा जाज्वल अभिमान. भारताबाहेर शिवरायांचे महती पोवाड्याद्वारे सांगणारे अण्णा भाऊ साठे हे पहिले शाहीर आहेत. १९६१-६२ चा हा कालखंड, अण्णा भाऊ साठे हा पोवाडा रशियामध्ये गाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तुत्वाचा परिचय करून देताना दिसतात.

अण्णा भाऊ जसे तळागाळातील कष्टकरी जनतेसाठी कामगारांसाठी लढले तसेच ते शेतकऱ्यांसाठीही लढले आहेत. हे त्यांच्या पुढील गीतातून दिसून येते.

*" तू खाशी कांदा भाकरी बसुनि अंधारी!*
*भुकेला कोंडा निजेला धोंडा बदल ही दुनिया सारी!!"*

किती आत्मविश्वासाने अण्णा भाऊ शेतकऱ्यांना जग बदलविण्याची प्रेरणा देतात. शेतकऱ्यांसाठी लढणारा एक योद्धा म्हणून अण्णा भाऊ साठे यांना गौरविणे अगदी रास्तच आहे. कारण ठाणे जिल्ह्यातील १९४४ साली भरलेल्या शेतकरी परिषदेमध्ये अण्णा भाऊ व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या लाल बावटा या कलापथकाद्वारे शेतकऱ्यांसाठी लावणी गायली होती. या लावणीतील शब्दांनी धगधगते ज्वालांचे रूप घेतले होते. अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा एक विशेष म्हणजे १९५८ मध्ये मुंबईला महाराष्ट्र दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून अण्णा भाऊ साठे यांना आमंत्रित केले होते. त्या साहित्य संमेलनाचे निमित्ताने अण्णाभाऊ साठे यांनी दलित साहित्य निर्माण होणे गरजेचे आहे ही महत्त्वपूर्ण बाब पटवून दिली. या साहित्य संमेलनात अण्णा भाऊ साठे यांनी जे भाषण केले आहे ते पुढील प्रमाणे, " महाराष्ट्र पुरते जरी बोलायचे झाले तरी दलित माणसांचा मोठा वर्ग या महाराष्ट्रात अस्तित्वात आहे. त्यांचे जीवन वेगळे असून इतर वर्गाशी ते संलग्न आहे. हा वर्ग या देशात अग्रेसर असून त्यांच्या न्याय संघर्षाचे परिणाम सर्व समाजावर होत असतात. तो या देशाचा सामाजिक आणि सांस्कृतिक पाया आहे. परंतु तो पिळला जाणारा नि कष्ट करणारा दलित म्हणून निराळा आहे नि उपेक्षित आहे. अशा या दलितांना आपले जीवनाचे स्पष्ट प्रतिबिंब आजच्या मराठी साहित्यात दिसत नाही. आजचे साहित्य आरशासारखे स्वच्छ असावे त्यात आपले प्रतिबिंब स्पष्ट दिसावे."

दलितांचे जीवनाचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटणे अण्णा भाऊ साठे यांना आवश्यक वाटते. कारण दलित लोकांच्या जीवनातील समस्या समाजापुढे आणायचे असतील तर साहित्य हे माध्यम गरजेचे आहे. एकंदरीत अण्णा भाऊंच्या या दलितांबद्दलच्या आकांक्षा, अपेक्षा पाहिल्या तर दलित साहित्याचे पहिले प्रेरक म्हणून डॉ.अण्णा भाऊ साठे यांना मान देणे उचित ठरते. अण्णा भाऊ साहित्य हे प्रेरणादायी साहित्य आहे. उपेक्षितांच्या जीवनाला न्याय मिळवून देणारे साहित्य आहे. हे त्यांच्या कथा कादंबऱ्यातील नायिकांच्या कणखर भूमिकेतून दिसून येते. अण्णांनी उभे केलेले नाही का शूर आहेत. आपल्या संस्कृती परंपरेची जपणूक करणाऱ्या आहेत. त्यांच्या कथा कादंबरीतील स्त्री सुशिक्षित नाही पण सुसंस्कृत मात्र आहे. अण्णा भाऊंना स्त्रियांच्या होणाऱ्या कुचंबने बद्दल राग होता. म्हणूनच ते स्त्रीच्या शीला संबंधी म्हणतात, "स्त्रियांचे शील हे काचेच्या भांड्याप्रमाणे नाजूक असतं. फुटलेलं काचेचे भांड पुन्हा सांधता येत नाही. तद्वतच स्त्रियांचे भ्रष्ट झालेलं शील पुन्हा पवित्र करता येत नाही. परंतु त्यासाठी माणसाच्या मनाची तयारी मात्र पाहिजे."

डॉ.अण्णा भाऊ साठे यांचे वैचारिक साहित्य वास्तवाला निगडित आहे. अन्याय, अत्याचार, दुरावस्था इत्यादी समाजवास्तवांची ते दखल घेते. मुंबई कोणाची? हे वगनाट्य विनोदी स्वरूपाचे असले तरी त्यातून भयान वास्तव्य मांडले गेले आहे. शिवाजी पार्क मैदान येथे अण्णा भाऊ साठेंचे लोकनाट्य पाहण्यासाठी तुफान गर्दी भरलेली होती. अख्या महाराष्ट्रातून मोठ-मोठे राजकारणी लोक संयुक्त महाराष्ट्राच्या परिषदेला उपस्थित होते. संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे औचित्य साधून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी तेथे 'माझी मैना' हे लोकनाट्य सादर केले. ज्यावेळी अण्णा भाऊ आपल्या खणखणीत आवाजामध्ये, डफतून-तुण्याच्या साथीने ' माझी मैना गावावर राहिली' हे गीत गाऊ लागले त्यावेळी मात्र संपूर्ण मैदान दणाणून गेल्याचे दिसते. या गाण्यांमध्ये मुंबईची ताटातून महाराष्ट्रापासून कशी होते. याचे अतिशय हृदय द्रावक वर्णन अण्णाभाऊ साठे यांनी केले आहे. 'अकलेची गोष्ट' हे त्यांचे लोकनाट्य अतिशय लोकांच्या पसंतीस उतरलेले आहे लोकशाहीर अण्णा भाऊ साठेंसोबत अमर शेख व गव्हाणकर यांनी अगदी समोर असून या नाटकांमध्ये अभिनय केला होता. आणि तो अभिनय विनोदाच्या स्वरूपात असल्याने शिवाजी पार्क मैदान हास्य आणि फुलले असल्याचे दिसते. लोकांना ते नाटक इतके आवडले की टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र साहित्य बद्दल जर बोलायचे झाले तर त्यांचे साहित्य हे वास्तववादी जीवनावर आधारलेले साहित्य आहे. ते मनोरंजनातून बोधाकडे नेते. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन करणारा वाचक आजही मोठ्या प्रमाणात दिसून येतो. लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांना तळागाळातील सर्व जनता एक साहित्यिक या नात्याने ओळखते. त्यामुळे आजही त्यांची जयंती सर्व जाती-

धर्माचे लोक साजरी करताना दिसतात. एकंदरीत समाजातील जयंतीचे स्वरूप व अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक कार्याचा अभ्यास केल्यानंतर पुढील निष्कर्ष आढळून येतात.

**निष्कर्ष :**

१. मानवतावादी, समताधिष्ठ, स्वाभिमानी आणि संघर्षवादी समाज निर्माण व्हावा हे जयंती साजरीकरणाचे एकमेव उद्दिष्ट आहे.

२. महाराष्ट्रातील सर्व महापुरुषांच्या जयंत्या तळागाळातील सर्व जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन करणे गरजेचे आहे .

३. महापुरुषांच्या कार्याचा गौरव केवळ भाषणातून नव्हे तर कृतीतून झाला पाहिजे.

४. ग्रामीण भागात आजही जातीयतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येते. हे जातीयतेचे प्रमाण प्रबोधनाद्वारे दूर केले पाहिजे.

५. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, मुक्ता साळवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय केवळ एकाच जातीला समाजातील समग्र मानव जातीला करून देणे आवश्यक आहे.

६. लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याचा गौरव करणे आवश्यक असल्याचे दिसते.

७.लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या कथा कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिरेखा स्त्रियांना स्वाभिमानानं, सनमानानं जगण्यास प्रेरित करतात.

**संदर्भ ग्रंथ :**

१. अण्णा भाऊ साठे : 'निवडक वाडमय', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ,मुंबई.

२.जनार्दन वाघमारे, ' दलित साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,२०१४.

३. प्रा. भंडारे विठ्ठल, 'अण्णाभाऊ व सामाजिक परिवर्तन', अस्मिता प्रकाशन नागपूर, प्रथमआवृत्ती २००८.